# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक:- ईएलआर-२०२२/प्र. क्र.७४८/२२/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २१ ऑक्टोबर, २०२२.

प्रति,

१) विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी,
विधान परिषद शिक्षक मतदारसंघ, नागपूर, कोकण व औरंगाबाद विभाग.

२) जिल्हाधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी,
विधान परिषद शिक्षक मतदारसंघ, नागपूर विभाग व औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हे, कोकण विभागातील (मुंबई व मुंबई उपनगर वगळून) सर्व जिल्हे.

विषय :- राज्यातील सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसई, सीआयई इत्यादी अन्य मंडळाच्या शाळेतील शिक्षकांची विधान परिषद शिक्षक मतदारसंघा अंतर्गत मतदार म्हणून नोंदणी करण्याबाबत ...

संदर्भ :- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.अका १/निवडणूक -५/कावि-४५०/२०२२, दि.१०.१०.२०२२

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयावाबत संदर्भाधीन पत्रान्वये, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर यांनी राज्यातील सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसई, सीआयई इत्यादी अन्य शिक्षण मंडळाच्या शाळेतील पुर्ण वेळ शिक्षकांची विधान परिषद शिक्षक मतदारसंघा अंतर्गत मतदार म्हणून नोंदणी करता येईल किंवा कसे याबावत या कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविलेले आहे.

या प्रकरणी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असता त्या विभागाने त्यांच्या दि.२०.१०.२०२२ रोजीच्या टिप्पणी अन्वये,"राज्यातील अन्य मंडळाच्या म्हणजेच सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसई, सीआयई इत्यादी मंडळांच्या अभ्यासक्रमांशी संलग्नित होऊ इच्छिणा-या शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत करण्यात येते. तसेच या शाळांना अन्य मंडळांच्या अभ्यासक्रमाशी संलग्न होण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी या शाळांना शालेय शिक्षण व क्रिडा विभागाव्दारे मान्यता प्रदान करण्यात येते", असे अभिप्राय दिलेले आहेत.

यास्तव प्रस्तृत प्रकरणी, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या अभिप्राय व भारत निवडणूक आयोगाच्या दि.०५.०९.२०१६ च्या पत्रातील निदेश विचारात घेऊन उचित कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(म.रा.पारकर)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी

प्रत :- उप जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर विभाग व औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हे, कोकण विभागातील (मुंबई व मुंबई उपनगर वगळून) सर्व जिल्हे.